# ३) संस्था निरिक्षण

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडे विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त  झाल्यानंतर एक महिन्याच्या आत प्राथमिक निरिक्षण करण्यांत येईल. संस्थेला निरिक्षणाचा दिनांक व वेळ कळविण्यांत येईल. जिल्हास्तरावरील प्राथमिक निरिक्षणात काही त्रुटी आढळल्यास त्याची पूर्तता करुन संबंधित विभागाच्या सहसंचालक प्रादेशिक कार्यालय यांचे मार्फत विभागीय स्तरावरील निरिक्षण करण्यांत येईल. तदनंतर संचालक, व्यवसाय शिक्षण यांचेमार्फत निरिक्षण अहवाल शासनाकडे सादर करण्यात येईल. शासनाकडून सदर अभ्यासक्रम सुरु करण्याचे मंजूरी आदेश प्राप्त झालेनंतर संबंधित संस्थेस मान्यताप्राप्त अभ्यासक्रम सुरु करता येतील.

संस्थेस मान्यता मिळाल्यानंतर संस्थेचे नियमित निरिक्षण करण्यांत येते. सदर निरिक्षणात संस्थेचे मुल्यांकन करुन संस्थेला "अ+, अ, ब, क, ड व इ" अशा प्रकारे मुल्यांकनावर आधारित दर्जा देण्यांत येतो. (फक्त उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्याक्रमास लागू)